महाराष्ट्र जनशक्ती | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २२५ वा | दिनांक : ०२/०७/२०२५ | वार : बुधवार

# राजदंडाला स्पर्श : नाना पटोले निलंबित



**मुंबई :** भाजप आमदार बबनराव लोणीकर यांनी जालना जिल्ह्यात केलेल्या वक्तव्य प्रकरणी काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी सभागृहात मांडला. या प्रकरणात लोणीकर, कृषिमंत्री आणि मुख्यमंत्र्यांनी माफी मागावी, अशी मागणी त्यांनी केली. त्यासाठी त्यांनी थेट विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या आसनाजवळ जात राजदंडला देखील स्पर्श केला. त्यामुळे अध्यक्षांनी त्यांनी एका दिवसासाठी निलंबित केले आहे. मात्र, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर रोज निलंबित केले तरी सभागृहात आवाज उचलणार असल्याचे म्हणत देवेंद्र फडणवीस हे शेतकरी विरोधी असल्याचा आरोप पटोले यांनी केला आहे.

काँग्रेस नेते नाना पटोले यांना अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी एक दिवससाठी निलंबित केले आहे. त्यानंतर विरोधकांनी सभात्याग केला. लोणीकरांनी शेतकऱ्यांचा अपमान केला असून, त्या प्रकरणी मुख्यमंत्र्यांनी माफी मागावी, अशी मागणी त्यांनी केली होती. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना पटोले म्हणाले की, आज शेतकऱ्यांचा दिवस आहे. भाजप महायुतीचे सरकार माज आलेले आहे. या सरकारची वास्तविकता आज समोर आली आहे. यांचे नेते शेतकऱ्यांना भिकारी समजतात. त्यांना कपडे हे घेऊन देतात. २०१४ च्या आधी लोणीकर उघडाच फिरत होता. जो शेतकऱ्यांच्या बाबतीत बोलेल त्याला निलंबित करणे आणि जे अपमान करतात त्यांना सन्मानाने बसवायचे, अशी टीका नाना पटोले यांनी केली आहे.

कुचरवट्यावर बसलेली काही रिकामटेकडी कार्टी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अंधभक्त म्हणतात. या कुचवट्यावर बसून सोशल मीडियावर चर्चा करणाऱ्या कार्ट्यांच्या माईचा पगार आणि बापाचे पेन्शन मीच दिले आहे, असे वादग्रस्त वक्तव्य बबनराव लोणीकर यांनी केले. नरेंद्र मोदींनी तुझ्या बापाला पेरणीला सहा हजार रुपये दिले आहेत. तुझ्या अंगावरचे कपडे, आणि पायातील बुट चप्पल सुद्धा सरकारमुळेच आहे. जालना जिल्ह्यातील परतुर येथे सोलर योजनेच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. विधानसभेत लीड नसल्यामुळे नाराजी व्यक्त करत लोणीकरांनी ग्रामस्थांना कानपिचक्या दिल्या. पाच वर्षांचे बलुतं, एक फुली द्या नाहीतर नका देऊ. पण तुम्ही मला नाही दिलं तरी पाच-दहा कोटी मिळतात हे डोक्यातून काढून टाका, असा टोला त्यांनी गावकऱ्यांना लगावला. तसेच, मी एक, दोन, तीन वेळा पाहिलं, त्यानंतर गावावर फुली मारील, असा थेट इशाराही त्यांनी दिला. त्यांच्या या विधानामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे.

सभागृहात काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी लोणीकर यांनी माफी मागावी अशी मागणी केली. त्यासाठी त्यांनी थेट विधानसभा अध्यक्षांच्या आसनासमोर जात राजदंडाला देखील स्पर्श केला. या वेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी वारंवार त्यांना जागेवर बसण्याची विनंती केली. मात्र, पटोले मागे हटले नाही. त्यानंतर अखेर अध्यक्षांनी त्यांना निलंबित करत सभागृहाचे कामकाज पाच मिनिटांसाठी स्थगित केले.

# शक्तिपीठ महामार्गाविरोधात शेतकऱ्यांचा एल्गार



**कोल्हापूर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा ड्रीम प्रोजेक्ट नागपूर ते गोवा प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गाविरोधात शेतकऱ्यांनी एल्गार पुकारला आहे. मंगळवारी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी कोल्हापुरात पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्ग दीड तास ठप्प केला. यावेळी तर काही आंदोलकांनी थेट पंचगंगा नदी पात्रात उड्या मारण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून त्यांना रोखले. शेतकऱ्यांच्या महागार्माविरोधातील या तीव्र भूमिकेमुळे सरकारची कोंडी होणार आहे.

राज्यातील १२ जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांनी एकत्रितपणे शक्तिपीठ महामार्गाविरोधात एल्गार पुकारला असून, कोणत्याही परिस्थितीत हा महामार्ग होऊ दिला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे हजारो हेक्टर सुपीक जमीन उद्ध्वस्त होणार असून, शेतकऱ्यांना तुलनेत कमी मोबदला मिळणार असल्याने शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाबाबत सरकार गंभीर नसल्याचा आरोप शेतकरी करत आहेत.

शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी शेतकऱ्यांना आजच्या आंदोलनात मोठ्या संख्येचे सहभागी होण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार, कोल्हापुरात सकाळी १० वाजल्यापासून पंचगंगा नदीपुलाजवळ शेकडो शेतकरी जमले. त्यांनी हातात फलक घेऊन आणि घोषणाबाजी करत महामार्गाच्या विरोधात संताप व्यक्त केला. या आंदोलनामुळे पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर सुमारे दीड तास वाहतूक ठप्प झाली होती. दरम्यान, कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी देखील मोठा बंदोबस्त तैनात केला होता.

या आंदोलनादरम्यान काही आंदोलकांनी चक्क नदीपात्रात उड्या मारण्याचा प्रयत्न केला. "सरकार आमच्या जमिनी काढून आमचे जगणेच हिरावून घेत आहे. मग आम्ही जगू तरी कशासाठी?" असा सवाल करत त्यांनी नदीपात्रात उड्या मारण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करत बळाचा वापर करून त्यांना रोखले.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे एकादशी निमित्ताने पंढरपूरला जाणार असल्याच्या पार्श्वभूमीवर राजू शेट्टी यांनी देखील विठुरायाला साकडे घालण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. "विठ्ठलाने मुख्यमंत्री फडणवीस यांना सुबुद्धी द्यावी, आणि हा अन्यायकारक महामार्ग रद्द व्हावा," असे साकडे विठुरायाला घालण्यासाठी पंढरपूरला जाणार असल्याचे राजू शेट्टी म्हणाले.

सरकारने शक्तिपीठ महामार्ग हा प्रतिष्ठेचा विषय करू नये. शक्तिपीठ महामार्गाला विरोध म्हणजे विकासाला विरोध असे समजू नये. ड्रोनद्वारे शेत जमिनीची मोजणी करण्यास कोणी आले तर गोफनद्वारे ड्रोन फोडू, असा इशारा राजू शेट्टी यांनी दिला.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०२ जुलै २०२५


## महाराष्ट्र शासन कृषी विभाग अंतर्गत खरीप हंगाम सन २०२४ करिता पीक स्पर्धेचे आयोजन



**दौलताबाद (जावेद अहेमद)** : महाराष्ट्र शासन कृषी विभाग अंतर्गत खरीप_हंगाम सन-2024 करिता पीक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.सदर पिक स्पर्धेत खरीप हंगामासाठी मुग, उडीद, सोयाबीन, तूर, मका, बाजरी, ज्वारी, भूईमूग व सुर्यफुल ही पिके स्पर्धेसाठी समाविष्ट होती.

मौजे दौलताबाद तालुका छत्रपती संभाजीनगर येथील शेतकरी लक्ष्मण भीमराव जगधने यांनी रुपये तीनशे प्रवेश शुल्क अदा करून खरीप भुईमूग या पिकासाठी सहभाग नोंदवला होतापीक लागवडीपासून ते काढणीपर्यंत सहाय्यक कृषी अधिकारी रंगनाथ पिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक दृष्ट्या योग्य पीक नियोजन केले.

पीक काढणी वेळी पर्यवेक्षण अधिकारी श्री रोहिदास राठोड व पीक कापणी प्रयोग समिती यांच्या देखरेखीखाली पीक कापणी प्रयोग करण्यात आला.पीक स्पर्धेच्या निकलांती श्री लक्ष्मण जगधने यांनी भुईमूग पिकाचे हेक्टरी १९.४९ क्विंटल उत्पादन घेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला.

माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांचे जयंती निमित्त कृषी दिनाचे औचित्य साधून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी पी. आर. देशमुख तसेच आत्मा प्रकल्प संचालक धनश्री जाधव यांचे हस्ते लक्ष्मण जगधने यांना पीक स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले.यावेळी कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी, कृषी विज्ञान केंद्र , छ. संभाजीनगर येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ, शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रासेयोच्या वतीने महिला महाविद्यालयात ऑक्सिजन हबची स्थापना



**छत्रपती संभाजीनगर (प्रा. डॉ. प्रतिभा धोंडकर)** : डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या पुढाकाराने दिनांक २८ जून रोजी "ऑक्सिजन हब" या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. पर्यावरण संवर्धन व जैवविविधतेच्या संरक्षणासाठी हा उपक्रम राबवण्यात आला.

या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.सुनिता बाजपाई, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. मीनल श्रीगिरीवार, डॉ. अन्विता अग्रवाल यांच्या हस्ते वृक्षारोपण करून ऑक्सीजन हब स्थापन करण्यात आले.

याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षक प्रा. माधुरी भावसार, डॉ. शिला जिरे, प्रा. ज्योती मंठाळकर, प्राध्यापक वृंद व स्वयंसेवक, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.ऑक्सिजन हब अंतर्गत महाविद्यालयाच्या आवारात विविध प्रकारच्या स्थानिक व पर्यावरणपूरक झाडांची लागवड करण्यात आली.

यामध्ये अशोक, पिंपळ, वड, अशोक, करंजी, गुलमोहोर, बहावा आदी झाडांची लागवड करण्यात आली. झाडांसाठी जलसिंचनाची व देखरेखीची व्यवस्था रासेयो स्वयंसेवकांमार्फत करण्यात आली आहे.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाची जाणीव निर्माण होईल तसेच प्रदूषण नियंत्रणात मदत होऊन परिसरातील हवामानात सकारात्मक बदल घडेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. मीनल श्रीगिरीवार, डॉ. अन्विता अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. प्रतिभा धोंडकर, प्रा. विशाखा जोशी तसेच सर्व स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.






## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात वसंतराव नाईक यांची जयंती साजरी



**जालना (प्रतिनिधी)** : बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात कृषी क्रांतीचे प्रणेते तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांना जयंती निमित्ताने अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. पवन देशमुख यांनी वसंतराव नाईक यांच्या कर्तृत्वाबद्दल विचार व्यक्त केले. ते म्हणाले, आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत वसंतराव नाईक यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

त्यांनी कृषी विकासात उल्लेखनीय कार्य केले म्हणून त्यांना कृषी क्रांतीचे जनक म्हटले जाते. शेतकरी सुखी आणि समृद्ध झाला पाहिजे तरच देश सुजलाम सुफलाम होईल हा संदेश त्यांनी दिला. दर्जेदार कृषी उत्पादन वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली. 1972 च्या भीषण दुष्काळात सर्वांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न उभा राहिला होता. त्यावेळी त्यांनी यातून मार्ग काढण्यासाठी रोजगार हमी योजना राबवली आणि येथील काबाडकष्ट करणाऱ्या शेतकरी आणि सर्वसामान्य लोकांना आधार दिला.

रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून अनेक कल्याणकारी कामे त्यांनी उभी केली. शेतकरी आणि सर्वसामान्य लोकांमध्ये त्यांनी स्वाभिमानाने जगण्याचा विचार दिला.यावेळी प्राचार्य डॉ.कविता प्राशर यांच्यासह डॉ. कल्याण कुंभार, डॉ. सुरेश कागणे, डॉ. प्रियदर्शन भवरे, प्रा. संदीप पाटील, डॉ. निलेश बर्डे, डॉ. निशिकांत लोखंडे, प्रा.शशिकांत चौधरी, डॉ. स्वाती पुरी, डॉ. क्षमा अनभुले, डॉ. सुनिता भराडे, डॉ. रवींद्र शिंपी, डॉ व्यंकट कोरेबोईनवाड ,वर्षा वानखेडे, श्री.विजय लोणकर, श्री. मिलिंद कुलकर्णी, श्री. अजय जोशी, श्री. पित्ती, श्री. राम हिवरेकर, श्री. शिवाजी जोशी, चरण पाटील, वसंत नरवडे यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०२ जुलै २०२५


## कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात, 'वसंतराव नाईक' यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन....



**शिरूर (का.) :** मंगळवार रोजी, शिरूर (कासार) जि.बीड येथील कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात,'हारित क्रांतीचे प्रणेते, पंचायतराज,श्वेतक्रांती,व रोजगार हमी योजनेचे जनक 'स्व.वसंतराव नाईक' यांची जयंती कृषीदिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी प्राचार्य केशव भांगे साहेब,यांच्या हस्ते,'माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक' यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्य केशव भांगे साहेबांनी आपल्या भाषणातून, वसंतराव नाईक हे प्रख्यात कृषीतज्ञ, प्रगतशील शेतकरी, राजनितीज्ञ आणि महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी सर्वाधिक काळ विराजमान होते. कृषी क्षेत्रात त्यांनी आपल्या महाराष्ट्राचे नाव देशभरात लौकीक केले.

तसेच आधुनिक भारतीय शेती आणि शेतकर्यांच्या त्यांनी मान उंचावल्या हे आपणास विसरता येणार नाही. असे मत आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

यावेळी उपप्राचार्य बसवेश्वर देशमाने, उपमुख्याद्यापक प्रकाश राठोड, पर्यवेक्षक जनार्दन काळे, परीक्षा विभाग प्रमुख प्रा.नामदेव तरकसे, प्रा.नारायण घोलप, प्रा.अशोक इनकर, प्रा.प्रशांत मळेकर, प्रा.अनिल जरे, प्रा.संजय काकडे, प्रा.बिभिषण घायाळ, प्रा.महादेव हांगे, प्रा.घनश्याम चव्हाण, प्रा.नारायण तांबे, प्रा.लक्ष्मण गव्हाणे, डॉ.आत्माराम झिंजुर्डे, डॉ.सत्यनारायण ढवळे, प्रा.दत्ता गायकवाड, प्रा.विश्वास ढाकणे, प्रा,अशोक सवासे, प्रा.दत्ता शिंदे, प्रा.सुनिल मोरे, प्रा.शशिकांत जावळे, प्रा.हनुमंत घायाळ, डॉ. अशोक घोडके, प्रा.बाळासाहेब खटाणे, प्रा.अमर खोले, प्रा.अक्षय रणखांब, प्रा.सविता दराडे, प्रा.रेखा निर्मळ प्रा.सिमा ढवळे, श्रीमती अनिता लाटे मॅडम, अर्जून नेटके, आबासाहेब ढवळे, रविंद्र बडे,बाळासाहेब येवले,वसंत आहेर, राजू बडे, आप्पासाहेब कांबळे, नितीन बहिर, रोहित शिराळे, रविंद्र गव्हाणे, सुंदर शिंदे, अक्षय साळवे, जितेश उगलमुगले, आदिनाथ काशिद, सुनिल खेडकर, विलास कांबळे, गौतम भोसले, दत्ता शिंदे इत्यादिंची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.विनोद गलांडे यांनी केले,तर आभार प्रदर्शन जयेंद्र निकम यांनी केले. विद्यालयातील सर्व कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांनी,'वसंतराव नाईक' यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून विनम्र अभिवादन केले.

## एनसीसी विभागाच्या यशाची परंपरा कायम



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील एनसीसी विभागाचा निकाल शंभर टक्के लागलेला आहे शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ मध्ये बी आणि सी प्रमाणपत्र परीक्षा ५३ महाराष्ट्र बटालियन लातूर यांच्या अंतर्गत घेण्यात आली.

यामध्ये बी प्रमाणपत्राच्या परीक्षेमध्ये सर्व कॅडेट्सनी अ ग्रेड प्राप्त केला व सी प्रमाणपत्राच्या कॅडेटसनी बी ग्रेड मिळवून प्रत्येक वर्षी प्रमाणे याही वर्षी ही यशाची परंपरा कायम राखली.

या यशाबद्दल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल भैया मोरे उपाध्यक्ष अश्लेष भैया मोरे यांनी शुभेच्छा दिल्या तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले सरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

या प्रसंगी डॉ विलास इंगळे , डॉ पद्माकर पिटले , कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले , श्री नितीन कोराळे, श्री राजकुमार सोनवणे , प्रा गुंडाबापू मोरे , प्रा शैलेश महामुनी सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या .

## मनपा प्रा.शा.विश्रांतीनगर शाळेत, आमदार मा.अतुलजी सावे यांच्यामार्फत विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा प्रा.शा. विश्रांतीनगर शाळेत, आपल्या शहराचे लाडके आमदार मा. अतुलजी सावे यांच्यामार्फत शाळेतील गोरगरीब विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी ॲड. ताराचंद गायकवाड, श्री.अशोक गोरे, श्री.अंकुश जाधव, श्री.हिंमतराव पटेल, श्री.संतोष बोधक, मुख्याध्यापक श्री.आवारेसर शाळेतील सर्व शिक्षक, बालताई, सेवक उपस्थित होते.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०२ जुलै २०२५


## मनपा केंद्रीय प्राथमिक शाळा, मुकुंदवाडी येथे 'चावडी वाचन' उपक्रम राबविण्यात आला





**छत्रपती संभाजीनगर :** मनपा केंद्रीय प्राथमिक शाळा, मुकुंदवाडी येथे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी तसेच सार्वजनिक वाचनाची सवय लागावी या उद्देशाने 'चावडी वाचन' उपक्रम शाळेचे मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.

या कार्यक्रमास कार्यक्रम अधिकारी मा.श्री. ज्ञानदेव सांगळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.या उपक्रमात मराठी व उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी विविध कथा, गोष्टी, मराठी - इंग्रजी कविता , संभाषण, संवाद, नाट्य आणि माहितीपर लेख वाचून दाखवले. विद्यार्थ्यांचा सहभाग उत्स्फूर्त व प्रेरणादायी होता. वाचन करताना त्यांनी आत्मविश्वासाने सादरीकरण केले.

सहशिक्षक श्री सचिन गायकवाड यांनी वाचनाचे महत्त्व सांगताना विद्यार्थ्यांना अधिकाधिक वाचन करण्यास प्रोत्साहित केले. त्यांनी स्पष्ट केले की वाचनामुळे केवळ भाषिक कौशल्येच नव्हे, तर विचारशक्ती आणि अभिव्यक्तीचेही विकास होतो.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढल्याचे आणि वाचनाची आवड निर्माण झाल्याचे निरीक्षण करण्यात आले. शाळेतील पालक व सर्व शिक्षकवर्ग यांनीही या उपक्रमाचे कौतुक केले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..

अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


## श्री. भाऊसाहेब बिराजदार स्मारक विद्यालय, येळी या विद्यालयाचे मुख्याध्यापक गुरुलिंग वाकडे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा उत्साहाने संपन्न झाला





**उमरगा (प्रा.नागसेन कांबळे) :** श्री. भाऊसाहेब बिराजदार स्मारक विद्यालय, येळी या विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीमान गुरुलिंग वाकडे सर यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा दि 30/ 06/ 2025 रोजी श्री. भाऊसाहेब बिराजदार स्मारक विद्यालयात..... येळी येथील सरपंच श्री. निवृत्ती पवार यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहाने संपन्न झाला.

प्रथमतः संस्थेचे संस्थापक स्व. भाऊसाहेब बिराजदार व साविञीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन द्विपप्रज्वलन..शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, बलसूर या संस्थेचे सचिव- आदरणीय प्रा. सुरेशदाजी बिराजदार साहेब, कोषाध्यक्ष- श्रीमान दत्तात्रय (काका) बिराजदार, सहसचिव- श्रीमान अशोकराव मोरे, संचालक- श्रीमान मारुती आंबेकर, विठ्ठल साई कारखान्याचे संचालक- श्रीमान शिवलिंग माळी, पोलीस पाटील- श्रीमान सूर्यकांत माळी, तंटामुक्त अध्यक्ष- श्रीमान संतोष जाधव, उपाध्यक्ष- श्रीमान रामलिंग बिराजदार, श्रीमान व्यंकटराव मोरे मान्यवरांच्या हस्ते करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सेवानिवृत्त उपमुख्याध्यापक श्री. अजय कुंभार सर यांनी केले.

सेवापूर्ती कार्यक्रमास आलेल्या सर्वच मान्यवरांचे स्वागत भाऊसाहेब बिराजदार स्मारक विद्यालयाच्या वतीने करण्यात आले.

त्यानंतर शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, बलसूर या संस्थेच्या वतीने मुख्याध्यापक श्रीमान गुरुलिंग वाकडे सरांचा सपत्नीक भव्य सत्कार करण्यात आला. श्री. भाऊसाहेब बिराजदार स्मारक विद्यालयातील शिक्षक-शिक्षकेत्तर स्टाफ च्या वतीने वाकडे सरांचा सपत्नीक भव्य सत्कार करून भेट वस्तू देण्यात आली. शिवाय संस्थेच्या शाखा श्री. छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बलसूर. श्री. छञपती शिवाजी विद्यालय, सालेगाव. श्री. बालाजी विद्यालय, तावशी गड. भाऊसाहेब बिराजदार वरिष्ठ महाविद्यालय, बलसूर.श्री. छत्रपती शिवाजी इंग्लिश स्कूल, बलसूर या शाळेतील प्राचार्य, मुख्याध्यापक व स्टाफ च्या वतीने वाकडे सरांचा सत्कार करण्यात आला.श्री. छञपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बलसूर या विद्यालयातील सेवानिवृत्त प्राचार्य श्रीमान जी एस चिलोबा सर, श्रीमान जी एस देवने सर, श्रीमान एस ए आवताडे सर. शिवशक्ती विद्यालय एकुरगा मुख्याध्यापक श्रीमान प्रकाश बोंडगे सर, दयानंद महाविद्यालय लातूर उपप्राचार्य श्रीमान अनिल माळी, कै. शरणाप्पा मलंग विद्यालय उमरगा मुख्याध्यापक श्रीमान अजित गोबारे सर, कुमारस्वामी विद्यालय उमरगा मुख्याध्यापक रेड्डी सर, जय स्वामी नारायण विद्यालय समुद्राळ मुख्याध्यापक श्रीमान कोकाटे सर, सखुबाई माध्यमिक विद्यालय बलसूरतांडा मुख्याध्यापक श्रीमान मोहन राठोड, भारत विद्यालय उमरगा सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्रीमान अलिसे सर व जि.प. शाळा येळी मुख्याध्यापक.सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्रीमान सुरेश रोहिणे सर, श्रीमान एम व्ही कांबळे, श्रीमान आय पी पाटील सर.सेवानिवृत्त उपमुख्याध्यापक श्रीमान अजय कुंभार सर.सेवानिवृत्त पर्यवेक्षक श्रीमान शिवाजी उपासे सर.सेवानिवृत्त प्राध्यापक श्रीमान जी व्ही परळकर.सेवानिवृत्त वरिष्ठ लिपीक श्रीमान गुलाबदास चव्हाण सर.भारत शिक्षण संस्थेचे संचालक- श्रीमान रमेश बिराजदार, क्रीडाशिक्षक- श्री एम डी काळे, बलसूर तंटामुक्ती अध्यक्ष- श्रीमान प्रदिप पाटील, उपाध्यक्ष- श्री सत्यनारायण जाधव, ग्रामपंचायत ग्रामपंचायत सदस्य- श्री पवन पाटील, श्री महादेव नांगरे, इंजिनिअर- श्री बन्शी चव्हाण, श्री संजय गव्हाणे, श्री महादेव विभुते, माजी तंटामुक्त अध्यक्ष- श्री वसंत साखरे, महादेव पवार, संजय पाटील, मुजावर गुडूसाहेब, सदाशिव हावळे, मनोज सूर्यवंशी, मल्लिकार्जुन मुळे, गुरुराज जट्टे, रामचंद्र कोरे, नरेंद्र पाटील, मोरे सर, विलास जवळगे, शेषराव संगुळगे व तालुक्यातील सेवानिवृत्त मुख्याध्यापक, शिक्षक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील आजी-माजी विद्यार्थी व वाकडे सरांचे पाहुणे या सर्वांच्याच वतीने वाकडे सरांना भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात संस्थेचे सचिव आदरणीय प्रा. सुरेशदाजी बिराजदार साहेब यांनी भाऊसाहेब बिराजदार स्मारक विद्यालयाचे नूतन मुख्याध्यापक श्री. सतीश वाकडे यांचे नाव जाहीर करुन वाकडे सरांचे पुष्पहाराने स्वागत केले.

या सेवापूर्ती सोहळ्यानिमित्त.... संस्थेचे सचिव आदरणीय श्रीमान सुरेशदाजी बिराजदार, श्री बालाजी आंबेकर, सांस्कृतिक विभाग प्रमुख बळीराम नांगरे, एस टी गायकवाड, बाळासाहेब मोरे, कु. दिव्या गायकवाड, श्रावणी वाकडे, दिव्या औटे यांनी मनोगत पर भाषण केले.

सत्काराला उत्तर सत्कारमूर्ती श्रीमान वाकडे सर यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप सरपंच श्री निवृत्ती पवार यांनी केले.

या कार्यक्रमाला फार्मसी काॅलेज उमरगा येथील प्राचार्य श्री कवलजीत बिराजदार, श्री. छञपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बलसूर प्राचार्य श्री जयचंद्र जाधव सर, पर्यवेक्षक श्री सतीश वाकडे सर, मुख्याध्यापिका श्रीमती उषा गवारे मॅडम, प्रभारी मुख्याध्यापक श्री विकास गोरे सर, श्री. सतीश पटवारी, श्री बाबळसुरे सर, श्री डिग्गे सर, श्री किसन पुजारी, श्री के टी गायकवाड, श्री सुधाकर साळुंके, श्री बाळासाहेब बिराजदार, प्रा राजेंद्र वाकडे, डाॅ. जयराज पटवारी, श्री शाहुराज मुडमे, संभाजी साखरे, सुरेश वाकडे, संजय वाकडे, ज्ञानेश्वर वाकडे, मनोज वाकडे, अशोक कुंभार, प्रफुल्ल वाकडे व संस्थेतील सेवानिवृत्त कर्मचारी, संस्थेच्या सर्व शाखेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, गावातील नागरिक, आजी-माजी विद्यार्थी, वाकडे सरांचा मिञपरिवार, पाहुणे व विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी भाऊसाहेब बिराजदार विद्यालयातील श्री. बालाजी आंबेकर, राजेंद्र पटवारी, प्रकाश टोपगे, राजेसाहेब मुजावर, उध्दव अकनगिरे, दासिमे सर, के डी कांबळे, शिवाजी कांबळे, अब्दुल अत्तार, अविनाश कोळी, सतीश कुंभार, राम दुधभाते व गणेश वाडीकर, सर्वच कर्मचारी बांधवांचे व विद्यालयातील विद्यार्थ्यांचे योगदान लाभले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पी बी सुर्यवंशी सर यांनी केले तर आभार श्री. राजेंद्र पटवारी सर यांनी मानले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०२ जुलै २०२५


## राहुल संत यांची वैजापूर काँग्रेसच्या तालुका अध्यक्षपदी निवड



**छत्रपती संभाजीनगर :** राहुल संत यांची वैजापूर काँग्रेसच्या तालुका अध्यक्षपदी निवड झाली असून त्याचे काँग्रेस नेते राजेश मुंढे यांनी सत्कार करून अभिनंदन केले यावेळी ह.भ.प. अच्युत महाराज कुलकर्णी महेश अचिंतलवर कैलास पाटील उपस्थित होते






## डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात वसंतराव नाईक जयंती निमित्त कविता, गाणी शेती मातीची कार्यक्रम संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात कृषिरत्न वसंतराव नाईक जयंती निमित्त शेती , शेतकऱ्यांबाबत संवेदना व्यक्त करण्यासाठी कविता गाणी शेती मातीची हा विशेष कार्यक्रम घेण्यात आला, या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. के. खिल्लारे हे होते.

मराठी विभाग व आजीवन शिक्षण विस्तार विभाग आयोजित या विशेष कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी यांनी शेती , शेतकरी , दुष्काळ , पीक पाणी शेती व माती संदर्भातील गाणी कविता सादर करून कृषिरत्न वसंतराव नाईक यांना आदरांजली वाहिली.

प्रारंभी प्रास्ताविक प्रा डॉ.नवनाथ गोरे यांनी केले यावेळी डॉ. बी.एन शिंदे यांनी काळया मातीत तिफण चालते या कवी विठ्ठल वाघांच्या कवितेने सुरूवात केली तर प्रा एन.एम.करडे यांनी कवी दत्ता हसलीगीकर यांची शेतकऱ्यांबाबत कृतज्ञता व्यक्त करणारी कविता सादर केली , डॉ. शारदा बुधवंत यांनी वसंतराव नाईक यांच्या विषयी कविता सादर केली.

या कार्यक्रमात डॉ. एस पी खिल्लारे, डॉ गणेश खिल्लारे, डॉ.सतीश वाघमारे, डॉ.प्रेमराज वाघमारे, डॉ. वनमाला लोखंडे, डॉ. अशोक केवटे, यांनी विविध गाणी, कविता सादर करून वसंतराव नाईक व शेतकऱ्यांबाबत संवेदना व्यक्त केल्या, अध्यक्षीय समारोपात डॉ. व्ही के खिल्लारे यांनी वसंतराव नाईक यांचे प्रशासनिक व कृषि विषयक वेगळेपण अधोरेखित केले. डॉ. नवनाथ गोरे यांनी सूत्रसंचालन तर आभार डॉ. गौतम घाडगे यांनी व्यक्त केले.




महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०२ जुलै २०२५

# पणत्यांचा उजेड पडला!

दिनांक 29 जून 2025 ला संध्याकाळी त्रिभाषा धोरणाचे दोन्ही शासन निर्णय मुख्यमंत्र्यांकडून रद्द करण्यात आले. म्हणून सर्वप्रथम मराठी भाषकांचे व सरकारचेही अभिनंदन. पण हे निर्णय तोंडी रद्द (लिखीत स्वरूपात नाही) करतानाच डॉ. नरेंद्र जाधव समिती नेमून पुन्हा घोळ घातलाच. डॉ. जाधव यांचा विषय अर्थशास्त्र आहे, भाषाशास्त्र- शिक्षणशास्त्र- मानसशास्त्र नाही. म्हणून ते या विषयाला न्याय देऊ शकणार नाहीत. सरकारने कितीही अनुकूल समित्या नेमल्या, तरी पहिलीपासून त्रिभाषा आम्ही महाराष्ट्राचे नागरिक स्वीकारणार नाही! आणि 5 वी पासून त्रिभाषेला आमचा विरोध नाही! पहिलीपासूनच्या त्रिभाषा सुत्राला पुन्हा पुन्हा अशी तात्पुरती स्थगिती नको, हे आदेश तात्काळ कायमचे लिखीत स्वरूपात रद्द करायला हवेत.

मुळात 8 वर्षापर्यंतच्या मुलांसाठी जे सूत्र नाही, अशा त्रिभाषा सूत्राच्या गोंडस नावाखाली, 5 वर्षांच्या कोवळ्या मुलांना हिंदी भाषा सक्तीची करू पाहणाऱ्या सरकारबद्दल मराठी माणसाच्या मनात प्रचंड राग आहे. तरीही महाराष्ट्रात असेही काही लोक आहेत की, ज्यांची मातृभाषा मराठी आहे, जे बऱ्यापैकी शिक्षित आहेत, कोणी साहित्यिक, कोणी कलावंत, कोणी शासकीय पारितोषिकप्राप्त आहेत; अशा लोकांचे या निर्णयाचे बाळबोध समर्थन ऐकून- वाचून आश्चर्य वाटते!

हिंदी जशी भारतीय भाषा आहे तशी मराठीही भारतीय भाषा आहे. म्हणून देशात इतरत्र मराठीही कुठंतरी सक्तीची करायला हवी. किमान इतर राज्यातून महाराष्ट्रात कायमचे रहायला आलेल्यांना तरी मराठी सक्तीची करा. फक्त हिंदीच भारतीय भाषा आहे असं नाही! केंद्रातील त्रिभाषा सुत्रानुसार बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि दिल्ली या फक्त चार राज्यात जरी मराठी सक्ती होत असेल, तरी महाराष्ट्रात हिंदी सक्तीला कोणीही विरोध करणार नाही! म्हणून तुमचा राजकीय पक्ष कोणताही असो, मराठी भाषेसाठी एक होत, एखाद्याची व्यक्तीगत महत्वाकांक्षा हाणून पाडली पाहिजे! हिंदी न शिकताच महाराष्ट्र इतका हिंदीमय झाला, तर शिकून काय होईल? उदाहरणार्थ, महाराष्ट्रात इंग्रजी माध्यमांच्या शाळेत शिक्षक- विद्यार्थी संवादात हिंदीत बोलतात. एकतर त्यांनी इंग्रजीत बोलले पाहिजे अथवा आपल्या नैसर्गिक भाषेत. शाळा इंग्रजी, शिक्षक- विद्यार्थी मराठी. मग ते हिंदीत का बोलतात? विशेष म्हणजे या प्रश्नाचे उत्तर शिक्षक, प्राचार्य आणि संस्था चालकानांही माहीत नाही! महाराष्टातल्या इंग्रजी माध्यमांच्या शाळेत हिंदीत बोलायचे असते, अशी एक अंधश्रध्दा तयार झाली आहे. म्हणून मुले धड इंग्रजी बोलू शकत नाहीत की हिंदी. मराठी मातृभाषा असूनही तिचे बारकावे मुलांना कळत नाहीत.

मराठी आणि हिंदी या दोन्ही भाषा पहिलीपासून शिकवणे सहज शक्य होणार नाही. दोन्ही भाषेतील समान लिपी, समान शब्द, वेगळे अर्थ, भिन्न उच्चार आणि सांस्कृतिक संकल्पना यातून मुलांच्या कोवळ्या मेंदूत खुप गोंधळ होणार आहे. आकलनात अडथळे येणार आहेत. उदाहरणार्थ, शिक्षा, प्रज्ञा, ज्ञान, चेष्टा इत्यादी. मुलांना परक्या हिंदीची अशी ही 'शिक्षा'! मुलांना भाषेव्यतिरिक्त इतर विषयही शिकायचे आहेत, हे लक्षात घेऊन मुलांची मानसिकता बिघडवू नये. हिंदी इयत्ता पाचवीपर्यंत बाजूला ठेवणे चांगले होईल. सरकारने त्रिभाषा पहिलीपासून सक्ती वगैरे शैक्षणिक, भाषिक प्रश्न, शिक्षण- भाषिक- मानसशास्त्रीय क्षेत्रातील तटस्थ तज्ज्ञांकडे सोपवून लोककल्याणात- लोकसमस्यात लक्ष घालणे चांगले.

पहिलीपासून हिंदी सक्तीचा निर्णय महाराष्ट्र सरकारने 10 ऑक्टोबर 2024 ला पहिल्यांदा घेतला. तेव्हापासून जवळपास 23 परप्रांतीय हिंदी भाषकांना फोनवर बोलत मराठी संवाद शिकवत आहे. सगळेच आता बऱ्यापैकी मराठी बोलू लागले. सध्या डोक्यात फक्त मराठी! बाकी कामात लक्ष लागत नाही आणि म्हणून दुसरे काही सुचतही नाही! आताच्या तात्पुरत्या निर्णयाने इतर कामे करता येतात का, प्रयत्न करून पहावा लागेल! महाराष्ट्रात अबू आझमी, अखिलेश यादव हिंदीच्या बाजूने उभे राहिले. म्हणजे महाराष्ट्रात कशा पध्दतीने राजकीय युत्या होताहेत बघा. मराठी माणसाने म्हणूनच खडबडून जागे झाले पाहिजे!

त्रिभाषा सुत्राविषयी मुख्यमंत्र्यांच्या मुलाखतीतला काही अंश चित्रफितीने समाजमाध्यमांवर फिरवला जात आहे. तसेच अन्य मंत्र्यांनी पत्रकार परिषदेत काही स्पष्टीकरणे दिली आहेत, ती पटण्यासारखी नाहीत. कारण महाविकास आघाडी असो की अजून कोणी, हा स्थानिक अहवाल (पहिलीपासून त्रिभाषा सक्तीचा), ज्यांनी कोणी स्वीकारला असेल ते दोषी आहेतच. पण केंद्राच्या एनइपीत त्रिभाषा सूत्रात पहिलीपासून सक्ती नाही, वयाच्या आठव्या वर्षापर्यंत मातृभाषेत शिक्षणाचा उल्लेख आहे. समजा महाविकास आघाडीने असा अहवाल स्वीकारला असेल, पण अंमलबजावणी आताचे सरकार करत आहे. का करत आहे? हे सरकार आघाडीतल्या पक्षांच्या आदेशाने चालते का? सरकार नागरिकांना जबाबदार आहे की विरोधी पक्षांना? आघाडीचे अनेक निर्णय या सरकारने रद्द केले, मग हाच का उचलून धरला? रद्द का करत नाहीत? इतर माध्यमांच्या शाळेत हिंदी विषय शिकवला जातो, असेही सांगण्यात आले. शिकवला जात असेल तर पालकांनी तो पर्याय निवडला आहे अथवा अज्ञानात ते सुखी आहेत. मराठी माध्यमांच्या सरकारी शाळेत हा निर्णय पहिलीपासून लादला जात आहे. अशी सक्ती नको, अशी आमची भूमिका आहे. मुलाखतीत मुख्यमंत्री म्हणतात, 'गुजराथमध्येही हिंदी तिसरीपासून सक्तीची केली आहे.' यानंतर, मग महाराष्ट्रात पहिलीपासून का? असा प्रश्न मुलाखत घेणाऱ्याने विचारायला हवा होता. पण मुद्दा सोडून पत्रकार दुसऱ्या गोड प्रश्नाकडे वळतात. त्रिभाषा सक्तीचं सूत्र पाचवीपासून लागू केलं की, सरकारला उलटसुलट युक्तीवाद करण्याची गरजच उरणार नाही...

रोजचे सगळे असे सरकारी युक्तीवाद ऐकत दिनांक 27 जून 2025 ला सकाळी 10 वाजता मुख्यमंत्र्यांना ईमेलने पत्र पाठवले. पत्र तात्काळ वाचता यावे म्हणून सगळ्या मुद्यांचे पाल्हाळ न लावता संपृक्त आशयात लिहिले-"मा. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.विषय : लहान मुलांना वयाच्या आठव्या वर्षापर्यंत आपापल्या मातृभाषेत- बोलीभाषेत शिक्षण द्यावे.महाशय, त्रिभाषा वा हिंदी सक्ती हा विषय भाषाशास्त्र, शिक्षणशास्त्र व बालमानसशास्त्राशी संबंधित असून केंद्राच्या एनइपीत मुलांच्या वय वर्षे आठपर्यंत फक्त मातृभाषेतच शिक्षण द्यावे असे नमूद आहे. सरकारांत या विषयांचे कोणी तज्ज्ञ नाही. म्हणून सरकारने हिंदीचा भलताच राजहट्ट करत स्थानिक लोकसंस्कृतीचे सपाटीकरण करू नये. लहान मुलांना वयाच्या आठव्या वर्षापर्यंत आपापल्या मातृभाषेत, अगदी त्या त्या ग्रामीण- आदिवासी बोलीभाषेत शिक्षण द्यावे. भाषावार प्रांत रचनेच्या आचार संहितेनुसार महाराष्ट्राच्या स्थानिक अस्मितेचे जतन करावे, असे आमचे म्हणणे आहे.

तरी सदर आदेश त्वरीत कायमस्वरूपी रद्द करावा ही विनंती." या पत्राची अजून पोच नाही, पण निर्णय रद्द झाला हे महत्वाचे.

रविंद्रनाथ टागोर यांच्या एका कवितेचा आशय असा आहे, "सूर्य अस्तास जाताना म्हणाला, आता माझी विश्रांतीची वेळ झाली, सर्वदूर अंधार पसरेल, माझी जागा कोण घेईल? तेव्हा एक पणती पुढे येऊन म्हणाली, मी आहे ना, तू विश्रांती घे!" पणतीचा हा अहंकार नाही, आत्मविश्वास आहे. सूर्याची जागा कोणी घेऊ शकत नाही, पण आजूबाजूचे थोडे दिसू शकेल इतका उजेड पणती देऊ शकते. मराठीच्या बाजूने अशा असंख्य नागरिकांनी पणती- मेणबत्ती होत जागोजागी उभे राहून उजेड निर्माण केला आणि महाराष्ट्र उजळून निघाला. त्या सर्व सुजाण मराठी लोकांचे अभिनंदन.

पहिलीतल्या कोवळ्या मुलांना हा सगळा गोंधळ माहीतही नाही. पण या सक्तीच्या निर्णयाला त्यांचा आत्मा म्हणेल :"त्याची भाषा माझी नाही माझी भाषा त्याची नाही,मी बोलतो, ते त्याला कळतेतो बोलतो, ते मला कळते,तो माझी भाषा शिकला नाहीमी त्याची भाषा शिकलो नाही...हा लाडीगोडी घोड्यावर बसताच याला 'उंट पहाड के निचे' दिसला,माझीच भाषा मुलांना शिकवाम्हणून हट्ट धरून बसला...अरे देवसुध्दा परंपरेने मंत्रांतूनएकच भाषा शिकला मग आम्हा बागडत्या मुलांनाच इतक्या भाषा कशाला?" (सुरादे).

**डॉ. सुधीर राजाराम देवरे**
ब्लॉगचा पत्ता :
http://sudhirdeore२९.blogspot.com/

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002